MHKO140002612025

**<u>नियमित दिवाणी दावा नं.६९/२०२५</u>**

**तुकाराम गुंडू गावडे आणि वगैरे**

**विरुद्ध**

**अरुण धाकलू केंगरे आणि वगैरे**

## <u>निशाणी १४ खालील आदेश</u>

**(दिनांक ११/०२/२०२६)**

१. प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी त्यांचेविरुद्ध पारित लेखी जबाब नाहीचा आदेश रद्द होवून लेखी जबाब सादर करण्याची परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. त्यांनी असे कथन केले आहे की, वादी यांनी प्रस्तुत दावा हक्कज्ञापन आणि कायम मनाई आदेश मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी कैफियत मुदतीत दाखल न केल्यामुळे त्यांच्याविरुध्द आदेश पारित झालेला आहे. प्रतिवादी हे व्यवसायाने शेतकरी असून अल्पशिक्षीत असलेमुळे तसेच प्रस्तुत कामी वादीचे दावेस कैफियत सादर करणेकरीता आवश्यक असणारी कागदपत्रे जसे की, ७/१२ उतारे, फेरफार उतारा, मृत्यूदाखले इत्यादी वेळेत उपलब्ध न झालेमुळे वादीचे दावेस प्रतिवादी यांना कैफियत व तुर्तातुर्त मनाई अर्जास म्हणणे कायद्यात अंतर्भूत असलेल्या वेळेत सादर करता आलेली नाही. त्यामुळे सदरचा विलंब माफ होवून प्रतिवादी यांना लेखी जबाब सादर करण्याची परवानगी मिळणे आवश्यक आहे. करीता प्रस्तुतचा अर्ज.

३. वादीचे सुविद्य विधिज्ञ यांनी अर्जास म्हणणे सादर करुन विरोध दर्शविला आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, प्रतिवादी यांना निशाणी क्र.७ प्रमाणे समन्स व नोटीसा लागु होऊन देखील प्रतिवादी यांनी मुदतीत कैफियत व म्हणणे दाखल करणे गरजेचे होते. परंतु सदर प्रतिवादी यांनी कायद्याने घालून दिलेली मुदत संपुन देखील आपले म्हणणे दाखल केलेले नाही. त्यामुळे सदर प्रतिवादी यांनी आपला कैफियत देणेचा हक्क गमावला आहे. सदर अर्जात नमुद

केलेले कारण योग्य नाही. सदर प्रतिवादी यांनी जाणीवपुर्वक वेळेत कैफियत व म्हणणे दाखल करणेस टाळाटाळ केलेली आहे. त्यामुळे अर्ज खर्चासह नामंजुर होण्यास पात्र आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही पक्षाचे सुविद्य विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरुन असे दिसून येते की, वादी यांनी प्रतिवादी यांच्याविरुध्द हक्कज्ञापन आणि कायम मनाई मिळणेसाठी दावा दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.१ ते ४ हे प्रकरणामध्ये दिनांक २४/०६/२०२५ रोजी हजर झाले आहेत. परंतु त्यांनी मुदतीच्या आत लेखी जबाब सादर केलेला नाही. प्रतिवादी यांनी जवळपास अंदाजे ४ महिन्यापेक्षा जास्तीचा विलंब केलेला आहे. परंतु दरम्यानच्या कालावधीमध्ये प्रस्तुतच्या प्रकरणामध्ये पुढील सुनावणी झालेली नाही आणि प्रकरण हे तात्पुरत्या मनाई आदेश मिळणेच्या अर्जावर सुनावणी करिता प्रलंबित आहे. तसेच प्रतिवादी यांनी अर्जासोबत लेखी जबाब सादर केलेला आहे. तसेच प्रस्तुत दाव्याचे स्वरुप पाहता विलंब झाल्याच्या कारणावरुन प्रतिवादी यांना लेखी जबाब सादर करण्याची संधी नाकारणे योग्य होणार नाही. दावा गुणवत्तेवर निकाली काढण्यासाठी प्रतिवादी यांना कैफियत सादर करण्याची परवानगी देणे आवश्यक आहे. अर्ज मंजुर झाल्यास वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. कारण दाव्यामध्ये वादी यांचा पुरावा सुरु झालेला नाही. प्रकरणात गुणवत्तेवर न्यायनिर्णय होण्यासाठी प्रतिवादी यांना लेखी जबाब सादर करण्याची परवानगी देणे नैसर्गिक न्याय तत्वाच्याआधारे आवश्यक व न्यायोचित आहे. तसेच झालेल्या विलंबाबाबत खर्च बसविणे आवश्यक आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्ज रक्कम रु.५००/- बसवून मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचेविरुद्ध पारित विना लेखी जबाब आदेश रद्द करण्यात येतो.

३. खर्चाची रक्कम वादी यांना देण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by WAMAN DIGAMBAR JADHAV
Date: 2026.02.12 11:28:40 +0530

दि.११/०२/२०२६

**(वामन डी. जाधव)**
**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, चंदगड**